# सुमनमाला

मी जाता राहील काळ काय, जन पळभर म्हणतील हाय हाय. ही कवितेची ओळ हल्ली ह्यांच्या तोंडी फार असे. 89 वर्षे पूर्ण होऊन 90 वे वर्ष लागले. मुलगा सून नात भुवनेश्वरला बोलवत असून सुध्दा गेलो नाही. कारण नातू (मुलीचा मुलगा) आमच्याकडे रहात असे तो ब्रिटिश महेंद्र ला काम (सर्व्हिस) करायचा. तेव्हा आम्ही भुवनेश्वरला गेलो तर तो एकटा कुठे कसा राहील, काय खाईल ही चिंता त्यांना होती केवळ नातवासाठी पुण्याला राहिलो. तो दोन वर्षे आमच्या जवळ रहात होता. त्यामुळे नाही म्हटले तरी लळा लागलाच होता थोडा. दुसरा नातू तर 4 वर्षे राहिला (मुलाचा मुलगा). पण बी ई झाल्यावर लगेच अमेरिकेला गेला. त्याचे आई वडील ऑफिसर आहेत व भुवनेश्वराला रहातात म्हणून आम्ही लगेचच म्हणजे ऑगस्ट मध्यें भुवनेश्वरला यावे असे मुलाचे मत होते. पण नातीचे लग्न होते. हे कुंडली पहात होते. अत्यंत विद्वान व ज्योतिषतज्ञ माणूस म्हणून त्यांची प्रसिद्धी आजूबाजूला पसरली होती. तिचे लग्न ठरले लग्न झाले 28 नोव्हेंबरला. आता संक्रांतीनंतर भुवनेश्वरला कायमचे जाऊ असे ठरले. 26 जानेवारीला मुलगा (सतिश) आला व त्याच वेळी हे नेमके आजारी पडले. छाया (दोन नंबरची मुलगी) डॉक्टर, तिला लगेच बोलाविले. त्यांची अतिशय लाडकी व काळजी करणारी म्हणून तिला बोलावून घेतले. आमच्या घरांत तिनें मला व ह्यांना वाचविले होते. ह्यांचे जळगावला ऑपरेशन होते हर्णियाचे. दोन्ही हर्णियांचे ऑपरेशन करावे लागले. दुसरे ऑपरेशन ईमर्जन्सी होते, रात्री 12 वाजता. ऑपरेशन जळगावला झाले त्यावेळी डॉक्टरीण बाई स्वतः हजर होत्या. आई ग, दादाना गँगरिन होईल अशी भीती आहे, आता मात्र खरे नाही. देवावर हवाला ठेवून ती रामरक्षा व मी हनुमान चालिसा म्हणते होतो. त्यातून ते पूर्णपणे बरे झाले. पुण्याला स्थायिक व्हायचा निर्णय झाला तेव्हा नातू (दोन्ही) येतील ही अपेक्षाच नव्हती. पण मुलाचा मुलगा (अनुष्टुभ) आधी आला. त्याने इलेक्ट्रॉनिक्स हा विषय घेतला. दुसरा नातू (मुलीचा मुलगा) होस्टेलवर राहायला लागला. त्यानें कॉम्प्युटर हा विषय घेतला. 2 वर्षे होस्टेलवर राहून त्यानंतर माझ्याकडे औधलाच राहू लागला.

---